**ठळक बातम्या**

- ज्येष्ठ उद्योगपती रतन टाटा यांचं काल दीर्घ आजारानं निधन, आज संध्याकाळी मुंबईत अंत्यसंस्कार

- देशविदेशातल्या मान्यवरांकडून रतन टाटा यांना आदरांजली अर्पण, त्यांना भारतरत्न देण्याची राज्य सरकारची केंद्राला विनंती

- २१ वी आसियान-भारत शिखर परिषद आणि १९ व्या पूर्व आशिया शिखर परिषदेत सहभागी होण्यासाठी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी लाओसमध्ये दाखल

**आणि**

- राज्यातल्या १९ जाती तसंच समुदायांचा ओबीसींच्या केंद्रीय यादीत समावेश करण्यासाठी राष्ट्रीय मागासवर्ग आयोगाची शिफारस

**<><><><><>**

ज्येष्ठ उद्योगपती, टाटा सन्सचे मानद अध्यक्ष आणि टाटा ट्रस्टचे अध्यक्ष रतन टाटा यांचं काल रात्री मुंबईत दीर्घ आजारानं निधन झालं. ते ८६ वर्षांचे होते. प्रकृती अस्वास्थ्यामुळे मुंबईतल्या ब्रीच कँडी रुग्णालयात त्यांना दोन दिवसांपूर्वी दाखल करण्यात आलं होतं. उपचारांदरम्यान काल रात्री त्यांची प्राणज्योत मालवली. त्यांचं पार्थिव सध्या मुंबईच्या एनसीपीए इथे अंत्यदर्शनासाठी ठेवण्यात आलं आहे. सायंकाळी वरळीत त्यांच्या पार्थिवावर शासकीय इतमामात अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत. राज्य सरकारनं टाटा यांच्या सन्मानार्थ आज राजकीय दुखवटा जाहीर केला असून आजचे सर्व नियोजित सरकारी कार्यक्रम रद्द करण्यात आले आहेत. राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत आज त्यांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. रतन टाटा यांचे कार्यकर्तृत्व लक्षात घेऊन त्यांना भारतरत्न देण्याची केंद्राला विनंती करणारा प्रस्तावही मंत्रीमंडळानं संमत केला.

**<><><><><>**

मुंबईत NCPA मध्ये विविध क्षेत्रातले मान्यवर, उद्योगपती, टाटा समूहाच्या विविध कंपन्यांचे कर्मचारी, राजकीय नेते, सामाजिक क्षेत्रातल्या व्यक्ती यांच्यासह मोठ्या प्रमाणात सामान्य नागरिक रतन टाटांच्या अंत्यदर्शनासाठी आले आहेत.

टाटा यांचं पार्थिव शरीर अंत्यदर्शनासाठी संध्याकाळी साडेचार वाजेपर्यंत एनसीपीए मध्ये ठेवण्यात येणार आहे. वरळीतल्या स्मशानभूमीत त्यांच्यावर शासकीय इतमामात अंत्यसंस्कार केले जाणार आहेत. केंद्रीय गृहमंत्री अमित शहा सरकारचे प्रतिनिधी म्हणून अंत्यसंस्काराला उपस्थित राहणार आहेत.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उद्योगपती मुकेश अंबानी यांनी रात्री रुग्णालयात त्यांचं अंतिम दर्शन घेतलं. उपमुख्यमंत्री अजित पवार, राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते प्रफुल्ल पटेल, जेष्ठ नेते शरद पवार आणि सुप्रिया सुळे, माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे, भारतीय रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नर शक्तिकांत दास, उद्योगपती कुमार मंगलम बिर्ला यांनी रतन टाटा यांचं अंत्यदर्शन घेतलं.

विविध देशांच्या मुंबईतल्या दूतावासांचे राजदूत, पोलीस खात्याचे वरिष्ठ अधिकाऱ्यांनी रतन टाटा यांचं अंत्यदर्शन घेतलं.

**<><><><><>**

प्रसिद्ध उद्योगपती रतन टाटा यांच्या निधनाबद्दल देशभरातल्या वरिष्ठ राजकीय नेत्यांसह विविध क्षेत्रातल्या प्रमुखांनी तीव्र दुःख व्यक्त करत त्यांना आदरांजली वाहिली आहे.

पद्म विभूषण रतन टाटा यांच्या निधनानं राष्ट्र निर्माणाला कार्पोरेट विकास आणि नैतिकतेची उत्कृष्ट जोड देणारं व्यक्तीमत्व हरपलं आहे, अशा शब्दात राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी त्यांना श्रद्धांजली वाहिली. भव्य स्वप्नं पाहण्याची आणि समाज ऋण फेडण्याची त्यांची तळमळ अद्वितीय होती, या शब्दात प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी रतन टाटा यांना आदरांजली वाहिली आहे.

संरक्षण मंत्री राजनाथ सिंग, अर्थमंत्री निर्मला सीतारामन, राज्यपाल सी पी राधाकृष्णन्, सरसंघचालक मोहन भागवत यांनी त्यांना आदरांजली वाहिली आहे. याशिवाय भाजपचे जेष्ठ नेते लालकृष्ण आडवाणी, माजी प्रधानमंत्री मनमोहन सिंग, पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी, मनसे प्रमुख राज ठाकरे, ज्येष्ठ अभिनेते अमिताभ बच्चन, क्रिकेटपटू सचिन तेंडुलकर, उद्योजक अनिल अग्रवाल, गौतम अदानी, आनंद महिंद्रा, टाटा यांनी शिक्षण घेतलेलं कोर्नेल विद्यापीठ यांनीही रतन टाटा यांना आदरांजली वाहिली आहे.

टाटा यांनी व्यापार आणि परोपकारात आपली अमिट छाप सोडली असल्याचं काँग्रेसचे नेते राहुल गांधी यांनी सांगितलं.

रतन टाटा यांनी मागे ठेवलेला उद्योग आणि परोपकाराचा असामान्य वारसा भारताच्या आधुनिक उद्योग नेतृत्वाच्या विकासाला नेहमी मार्गदर्शक ठरेल, असं गूगलचे मुख्य कार्यकारी अधिकारी सुंदर पिचाई यांनी म्हटलं आहे.

**<><><><><>**

रतन टाटा यांच्या कार्यकर्तृत्त्वाविषयी जाणून घेऊया आमच्या प्रतिनिधीकडून…

***व्हाइस कास्ट***

***न्यूयॉर्कमधल्या कॉर्नेल विद्यापीठातून आर्किटेक्चरमधली पदवी पूर्ण केल्यानंतर १९६२ मध्ये रतन नवल टाटा, टाटा समुहात रूजू झाले. त्यानंतर १९७५ त्यांनी हॉवर्ड बिझनेस स्कूलमधून व्यवस्थापन विषयातलं शिक्षण पूर्ण केलं. टाटा समुहातल्या अनेक कंपन्यांमध्ये काम केल्यावर १९७१मध्ये National Radio & Electronics Company Limited कंपनीचं प्रभारी संचालकपद दिलं गेलं. १९८१ मध्ये ते टाटा इंडस्ट्रीजचे अध्यक्ष झाले. १९९१ पासून २८ डिसेंबर २०१२ पर्यंत ते टाटा सन्सचे अध्यक्ष होते. त्यांच्या कार्यकाळात समुहाचा महसूल कित्येक पटीनं वाढला आणि २०११-१२ मध्ये १०० अब्ज डॉलरच्या पलीकडे गेला. रतन टाटा यांच्याच नेतृत्त्वाखाली टाटा मोटर्सनं प्रवासी वाहन क्षेत्रात प्रवेश केला. त्यानंतर नॅनो ही गाडी***

***बाजारात आणली आणि जग्वार लँड रोव्हर ही ब्रिटीश कंपनी विकत केली. रतन टाटा यांच्या मार्गदर्शनात टाटा स्टीलनं कोरस, टाटा समुहानं VSNL, टाटा टी नं टेटली हा ब्रिटीश समूह अधिग्रहित केला. २०२१ मध्ये एअर इंडियाच्या बोलीमध्ये यशस्वी ठरल्यानंतर रतन टाटा यांना खूपच आनंद झाला होता. जेआरडी टाटा आज आपल्यात असते तर त्यांचा आनंद गगनात मावला नसता, अशी प्रतिक्रिया रतन टाटा यांनी दिली होती. सेवानिवृत्तीनंतर रतन टाटा यांना टाटा सन्ससह इतर अनेक कंपन्यांचं मानद अध्यक्षपद दिलं गेलं होतं. टाटा समुहातल्या इतर सदस्यांप्रमाणे, त्यांनीही सामाजिक क्षेत्रात भरीव योगदान दिलं. शिक्षण, आरोग्य यासारख्या क्षेत्रातल्या त्यांच्या कामाचा कोट्यवधी लोकांच्या आयुष्यावर दीर्घ परिणाम दिसून येतो आहे. प्राणी, विशेषतः भटके कुत्रे आणि मांजरांची त्यांना विशेष काळजी होती. नुकतचं त्यांनी टाटा ट्रस्टकडून मुंबईत प्राण्यांसाठीचं रुग्णालय सुरू केलं होतं. वातावरण बदलासाठी कार्यरत असलेल्या इंडिया क्लायमेट कोलॅबोरेटिव्हचे ते संस्थापक होते. नुकत्याच झालेल्या लोकसभा निवडणुकीत त्यांनी मुंबईकरांना मतदान करण्याचं आवाहन केलं होतं. केंद्र सरकारनं २००८ मध्ये त्यांना पद्मविभुषण देऊन गौरवलं होतं. गेल्याच वर्षी राज्य सरकारनं पहिला उद्योग रत्न पुरस्कार देऊन त्यांचा सन्मान केला होता.***

***आकाशवाणी बातम्यांसाठी मुंबईहून जीवन भावसार***

**<><><><><>**

लाओसची राजधानी व्हिएंतियान इथं होणाऱ्या २१ व्या आसियान-भारत शिखर परिषदेला आणि १९ व्या पूर्व आशिया शिखर परिषदेसाठी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आज लाओसमध्ये पोहोचले. लाओसमधील भारतीय समुदायानं प्रधानमंत्री मोदी यांचं मोठ्या उत्साहात स्वागत केलं.

भारत-प्रशांत महासागर क्षेत्रातील शांतता, स्थिरता आणि समृद्धी यांच्यावर परिषदेत विचार केला जाईल. तसंच यावेळी आसियान नेत्यांसोबत होणाऱ्या बैठकीत आतापर्यंत सर्वसमावेशक धोरणात्मक भागीदारीच्या दिशेनं झालेल्या प्रगतीचा आढावा घेतला जाईल

आणि भविष्यातील सहकार्य निश्चित करण्याबाबतही चर्चा केली जाईल, असंही प्रधानमंत्र्यांनी यावेळी सांगितलं.

**<><><><>**

देशातल्या उद्योगांनी आकारमान आणि क्षमता वाढवावी असं आवाहन केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी केलं. नवी दिल्लीत PHD Chamber of Commerce and Industry च्या वार्षिक संमेलनाला ते संबोधित करत होते. येत्या २५ वर्षात सर्वच क्षेत्रात भारताला आघाडीवर नेण्याचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचं स्वप्न असल्याचं त्यांनी सांगितलं.

**<><><><>**

राज्यातल्या १९ जाती तसंच समुदायांचा ओबीसींच्या केंद्रीय यादीत समावेश करण्यासाठी राष्ट्रीय मागासवर्ग आयोगानं शिफारस केली आहे. यामध्ये लोढ, लोढा, लोधी, बडगुजर, सूर्यवंशी गुजर, लेवे गुजर, रेवे गुजर, रेवा गुजर, डांगरी, भोयर, पवार, कापेवार, मुन्नार कापेवार, मुन्नार कापू, तेलंगा, तेलंगी, पेंटारेड्डी, बुकेकरी या जाती, तसंच समुदायांचा समावेश आहे.

**<><><><>**

इफ्फी अर्थात गोवा आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव २०२४ च्या फिल्म बाजार विभागासाठी चार मराठी चित्रपटांची निवड करण्यात आल्याची घोषणा काल महाराष्ट्राचे सांस्कृतिक मंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी केली. या चित्रपटांमध्ये आत्मपॅम्प्लेट, तेरवं, विषय हार्ड आणि छबिला यांचा समावेश आहे.

**<><><><>**

महिलांच्या टी-ट्वेंटी विश्वचषक स्पर्धेत भारतानं काल दुबईत श्रीलंकेवर विक्रमी धावांनी विजय मिळवला. हरमनप्रीत कौर आणि स्मृती मन्धना यांच्या अर्धशतकांच्या बळावर भारतानं प्रथम फलंदाजी करत ३ गडी बाद १७२ धावा केल्या. त्यानंतर खेळायला आलेला श्रीलंकेचा संघ विसाव्या षटकात 90 धावांवर सर्व बाद झाला. अरुंधती रेड्डी,

आशा शोभना यांनी प्रत्येकी ३ गडी टिपले. २७ चेंडूत नाबाद ५२ धावा करणारी हरमनप्रीत सामनावीर ठरली. या स्पर्धेत आज संध्याकाळी बांग्लादेश आणि वेस्ट इंडीज यांच्यात सामना होणार आहे.

**<><><><><>**

फिनलँड इथं सुरू असलेल्या आर्क्टिक खुल्या बॅडमिंटन स्पर्धेत काल भारताच्या किरण जॉर्ज याने पुरुष एकेरीच्या उपउपांत्य पूर्व फेरीत प्रवेश केला. त्याने जागतिक क्रमवारीत २५व्या स्थानावर असलेल्या तैवानच्या वांग त्झू वेई याचा २३-२१, २१-१८ अशा सरळ गेममध्ये पराभव केला. आज किरण याचा सामना इंडोनेशियाच्या जोनाथन क्रिस्तीशी होणार आहे.

**<><><><><>**

भाषिक आणि सांस्कृतिक वैविध्यतेने परीपूर्ण असलेल्या भारतीय सिनेमाने देशाला एकत्र करण्यात महत्वाची भूमिका बजावली आहे, असं प्रतिपादन माहिती आणि प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव यांनी एका लेखात केलं आहे.  एक भारत, श्रेष्ठ भारत हा दृष्टीकोन अधिक बळकट करण्यात सिनेमा हे एक शक्तीशाली साधन आहे, असं वैष्णव म्हणाले. सिनेमा भाषिक आणि प्रादेशिक सीमा ओलांडतो, तसंच जनतेच्या सामायिक भावना आणि अनुभव चितारतो असं वैष्णव यांनी सांगितलं. भारतीय सिनेमाल जागतिक स्तरावर घेऊन जाण्याचं सरकारचं उद्दिष्ट असल्याचंही वैष्णव म्हणाले.

**//<><><><><>//**